# पोलीस आयुक्त कार्यालय,पुणे शहर
## दैनंदिन प्रेस नोट दि.२०/१२/१७
## दि.१९/१२/१७ रोजी रात्रौ ००/०० वा.ते २४/०० वा.पर्यंतचे दाखल गुन्हे

### भाग-१ ते ५ चे गुन्हे

१

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | भारती विद्यापीठ पो स्टे ६११/१७,भादविक २७९,३०४(अ),४२७,मोव्हे.१३२(१)(क),११९/१७७ |
| **फिर्यादी** | पवन भगवान जांभळे,वय-३०,रा.मुपो.जांभुळवाडी कात्रज,पुणे |
| **आरोपी** | अज्ञात ट्रक चालक |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.१९/१२/१७ रोजी १७/४५ वा. जांभुळवाडी दत्तनगर रोड भारती विद्यापीठ,पुणे येथे |
| **तपशिल** | यातील नमुद इसमाने त्याचे ताब्यातील ट्रक हा वाहतुकीचे नियमांकडे दुर्लक्ष करून, हयगयीने,अविचाराने व भरधाव वेगात चालवुन,नमुद ठिकाणी मोटार सायकलस्वार धनराज चंद्रकांत जांभळे,वय-३८,रा.मुपो.जांभुळवाडी,कात्रज,पुणे यांस जबर ठोस मारून,गंभीर जखमी करून,त्याचे मृत्युस कारणीभुत होवुन,अपघाताचे ठिकाणी न थांबता,अपघाताची खबर न देता पळुन गेला. |
| **त.अंमलदार** | सहा.पो.निरी. यादव ९४२२६४४५७७ |

२

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | भोसरी पो स्टे ५५४/१७,भादविक ३९४,३४ |
| **फिर्यादी** | ललीत बाफना,वय-३५,रा.दापोडी,पुणे |
| **आरोपी** | कारमधील दोन अनोळखी इसम |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.१८/१२/१७ रोजी २३/१५ वा. कलासागर हॉटेलचे समोर जुना मुंबई-पुणे रोड कासारवाडी, भोसरी,पुणे येथे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी हे त्यांचे कारमधुन घरी जात असताना अचानक त्यांचे समोर आलेल्या कारला फिर्यादी यांनी हॉर्न वाजविल्याचे कारणावरुन,कार मधील इसमांनी फिर्यादी यांना हॉर्न का वाजविला असे बोलुन फिर्यादी यांचे कारचा दरवाजा उघडुन त्यांना हाताने मारहाण करुन,त्यांना जखमी करुन त्यांचे गळयातील सोन्याची चेन २८,०००/- रु किची जबरदस्तीने हिसकावुन पळुन गेले आहेत. |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी. लांडगे |

३

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | कोथरूड पो स्टे ४७४/१७,भादविक ४२०,४६८,४७१,३४ |
| **फिर्यादी** | अभिजीत जोगदंड,वय-३५ वर्षे,पो.उप-निरी. कोथरुड पोलीस स्टेशन पुणे शहर |
| **आरोपी** | १.वैभव सुरेश चौगुले,वय-२५ वर्षे,रा.मुपो.धोंडेवाडी,ता.कराड,जि.सातारा व इतर साथीदार (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.१९/१२/२०१७ रोजी १४/०० वा. लोटस ग्रुप (लो मनि एन्टरप्रायझेस) कंपनीचे ऑफिस, चौथा मजला,ऑफिस नं.३०,सनं.८९/९०,प्लॉट नं.४४,लोकमान्य हाऊस,पौड रोड,कोथरुड,पुणे |
| **तपशिल** | यातील नमुद इसमांनी आपसात संगनमत करुन,लोटस ग्रुप (लो मनी एन्टरप्रायझेस) कंपनीचे ऑफिस,पौड रोड,कोथरुड,पुणे याठिकाणी ऑफिस सुरु करुन,याठिकाणी सर्वप्रकारे कर्ज प्रकरणे केली जातील अशा प्रकारचे वर्तमान पत्रामध्ये जाहिरात देवुन,नागरीकांकडुन कर्ज प्रकरण मंजुर करून देण्यासाठी व्हेरीफिकेशन व ॲग्रिमेंटसाठी पैसे स्विकारून,सदर इसमांनी स्वतःचे ओळखपत्रे व इतर कागदपत्रे बनावट तयार करुन,तसेच वैभव चौगुले याने स्वतःचे आधारकार्ड विनोद बबन पाटील यानावाने बनावट तयार करुन,नागरीकांची तसेच केंद्र शासनाची फसवणुक केली आहे. |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी. दिगंबर जाखडे |

४

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | सहकारनगर पो स्टे ३७३/१७,भादविक ४०६,४२० व महाराष्ट्र ठेवीदारांच्या हित संबंधाचे संरक्षण अधि. कलम ३ प्रमाणे |
| **फिर्यादी** | सुखदेव बसंतानी,वय-५५ वर्षे,रा.पिंपरी कॉलनी,पुणे |
| **आरोपी** | १.विजय अर्जुन कचरे, चेअरमन व मॅनेजिंग डायरेक्टर,कुबेर ॲग्रो डेव्हलपमेंट इंडीया प्रा. लिमी. ऑफीस नं.१६/१७,स.नं.२०१,शेवंता हाईट्स,पुणे-सातारा रोड,बालाजीनगर,पुणे (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.१०/०७/१३ ते दि.०१/११/१३ रोजीपर्यंत कुबेर ॲग्रो डेव्हलपमेंट इंडीया प्रा. लिमी. चे ऑफीस नं.१६/१७,स.नं.२०१,शेवंता हाईट्स,पुणे-सातारा रोड,बालाजीनगर,पुणे येथे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी यांना यातील नमुद इसम विजय कचरे याने त्यांचे कंपनीत पैसे गुंतविल्यास तीन ते सहा वर्षाचे कालावधीत त्यांना दामदुप्पट पैसे मिळतील असे सांगुन त्यांचा विश्वास संपादन करून,फिर्यादी यांना वेळोवेळी त्याचे कंपनीत विश्वासाने वेग-वेगळ्या मुदतीसाठी एकुण १०,३८,०००/- रुची गुंतवणुक करण्यास भाग पाडुन,सदर गुंतवुणुकीची मुदत पुर्ण होऊन देखील फिर्यादी यांना पैसे परत न करता,सदर पैशांचा अपहार करून फिर्यादी यांची फसवणुक केली आहे. (फिर्यादी यांनी प्रथम तक्रारी अर्ज केल्यानंतर सदरचा गुन्हा दाखल केला आहे.) |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी. बडे |

५

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | वाकड पो स्टे ७१३/१७,भादविक ४१९,४२०,माहिती व तंत्रज्ञान का.क.६६(क)(ड) |
| **फिर्यादी** | विकास किर्तने,वय-४८,रा.वाकड,पुणे |
| **आरोपी** | सोमनाथ सुफरे ऊर्फ अजय बाबुराव जगताप,वय-४६,रा.तुळजाभवानी नगर,पुणे(अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.०५/०४/१७ ते दि.१८/१२/१७ रोजीचे कालावधीत मयुर इस्टेट वाकड,पुणे येथे ऑनलाईन माध्यमाव्दारे |
| **तपशिल** | यातील नमुद इसम सोमनाथ जगताप यााने फिर्यादी यांचे मोबाईलवर फोन करुन,त्यांना कर्ज देण्याचे अमिष दाखवुन,प्रोसेसींग फी करीता एकुण ३०,०००/- रुपये ऑनलाईन घेऊन, फिर्यादी यांना कर्ज न देता त्यांची फसवणुक केली आहे. |
| **त.अंमलदार** | पो.निरी.(गुन्हे) सुनिल पिंजण ८१०८१२८४२२ |

६

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | मार्केटयार्ड पो स्टे २४८/१७,भादविक ३८५,३८६,३८७,५०६(२),५०४,३४ |
| **फिर्यादी** | एक पुरूष,वय-३०,रा.पुणे |
| **आरोपी** | दोन इसम (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.१९/०७/१७ ते दि.२२/११/१७ रोजीचे कालावधीत पुणे-सातारा रोड, मार्केटयार्ड,पुणे येथे |
| **तपशिल** | यातील नमुद इसमांनी फिर्यादी यांचे बहिणीस शिवीगाळ करुन जीवे मारण्याची धमकी देऊन तसेच तीचेवर ॲसीड टाकुन मारण्याची धमकी देऊन,फिर्यादी यांचेकडुन १,५८,०००/- रुपये ऑनलाईन घेऊन देखील आणखी ६० लाख रुची मागणी केली आहे. (फिर्यादी यांनी आज रोजी तक्रार दिल्याने गुन्हा दाखल केला आहे.) |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी. भोसले ९१३९७७७१११ |

७

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | सांगवी पो स्टे ५०४/१७,भादविक ३५३ |
| **फिर्यादी** | विश्वनाथ साठे,वय-५८ वर्षे,रा.आनंद पार्क,पिंपळे-गुरव,पुणे |
| **आरोपी** | योगेश विजय गायकवाड,रा.पी.डब्लु.डी कॉलनी,डी/२/१४,नवी सांगवी,पुणे (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.१९/१२/२०१७ रोजी सकाळी ११/०० वा.पी.डब्लु.डी.कॉलनी-डी/२,इमारती समोर नवी सांगवी,पुणे |

| | |
|---|---|
| **तपशिल** | यातील फिर्यादी हे पी.डब्लु.डी.कॉलनी येथील डी/२/३४ हे निवास्थान ताब्यात घेण्यासाठी नमुद ठिकाणी आले असताना,यातील नमुद इसम योगेश गायकवाड याने फिर्यादी यांना त्यांचे कामापासुन परावृत करण्याचे उद्देशाने अपशब्द वापरुन,धक्का-बुक्की करून,तु काम कसे करतो ते मी बघतो,तुला कोणास काय सांगायचे ते सांग अशी धमकी देवुन,ते करीत असलेल्या शासकीय कामात अडथळा निर्माण केला आहे. |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी. एस.जी.पाटील ९४०३९०५६९१ |

## दि.१९/१२/१७ रोजी रात्रौ ००/०० वा.ते २४/०० वा.पर्यंतचे दाखल गुन्ह

**१**

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | वाकड पो स्टे ७१५/१७,भादविक ३९२,३४ |
| **फिर्यादी** | प्रत्युश नंदवयोलीयार,वय-३९,रा.वाकड,पुणे |
| **आरोपी** | मोटार सायकलवरील तीन अनोळखी इसम |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.१९/१२/१७ रोजी २२/१५ वा.जगताप डेअरी चौकाकडुन काळेवाडी फाटया दरम्यान महिंद्रा वुड सोसायटी गेट जवळ |
| **तपशिल** | यातील फिर्यादी हे पायी जात असताना,नमुद इसमांनी दुचाकीवरून त्यांचे जवळ येवुन, फिर्यादी यांचे गळयातील दोन सोन्याची चेनी ७० हजार रू किमतीची जबरदस्तीने हिसका मारून,तोडुन चोरून नेली. |
| **त.अंमलदार** | सहा.पो.निरी. लोंढे |

## दि.१९/१२/१७ रोजी ००/०० वा. ते २४/०० वा. पर्यंतचा अटक आरोपी तक्ता

| अनं | पोलीस ठाणे | कलम | आरोपीचे नांव | वय |
|---|---|---|---|---|
| १ | खडक | भादविक ४२०,४६७,४६८,३४ | शेख नाहेज मुशीर | ३० |
| २ | पिंपरी | भादविक ४०८ | सुनिल वसंत मारणे | ३२ |
| ३ | बंडगार्डन | भादविक ३९३,३४ | हसन नुरमहमद कुरेशी | २७ |
| ४ | स्वारगेट | भादविक ३८२,३४ | सर्फराज समीर शेख | १९ |
| ५ | कोंढवा | भादविक ३६३,३६६(अ),३७६ | अमोल धनु चव्हाण | २२ |
| ६ | कोंढवा | भादविक ३६३,३८६,३४ | संतोष श्रीराम चोरमले | ३० |
| ७ | सांगवी | भादविक ३०७,३२६,३२३,१४३,१४९ | ऋतिक ताकेश्वर कुटे | १८ |
| ८ | सांगवी | भादविक ३०७,३२६,३२३,१४३,१४९ | सर्वदेव अरूण उपाध्याय | २२ |
| ९ | सांगवी | भादविक ३०७,३२६,३२३,१४३,१४९ | गोरख मच्छिंद्र राखपसरे | १८ |
| १० | सांगवी | भादविक ३०७,३२६,३२३,१४३,१४९ | श्रीकांत आत्माराम चौधरी | २० |

**जनसंपर्क अधिकारी,**
**पोलीस आयुक्त कार्यालय,पुणे शहर**